# महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण

८वा मजला, न्यु. एक्सलसियर
बिल्डींग, ए.के. नायक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१

दूरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com

क्र. संकीर्ण/प्र.क्र.२९५/प्रनिप्रा-२०१८ दिनांक २६ जुलै २०१८

## जाहिर नोटीस

प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या कार्यालयातील कामकाजाच्या अनुषंगाने १) लघुलेखक ,२) लिपीक टंकलेखक (मराठी/इंगजी) या पदांकरिता कंत्राटी पध्दतीने काम करण्यासाठी शासन विहित अटी-शर्तीनुमार विवक्षित कामासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

वरील पदांकरिता आवश्यक पात्रता प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केल्या आहेत. **पात्र उमेदवारांनी आपला अर्ज दिनांक १५/०८/२०१८ पर्यंत प्राधिकरणाच्या ई-मेलवर पाठवावा,** पात्र उमेदवारांच्या यादीची प्रसिध्दी प्राधिकरणाच्या (Web site) वर प्रसिध्द करण्यात येऊन मुलाखतीस हजर राहण्याबाबत तारीख/वेळ कळविण्यात येईल.

| अ. क्र. | पद/पदांची संख्या | पात्रता |
|---|---|---|
| १ | लघुलेखक पुर्णवेळ/अर्धवेळ संख्या (२) | अ) उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण<br>ब) मराठी व इंग्रजी व लघुलेखनाची गती ८० शब्द प्रती मिनीट, आणि मराठी व इंग्रजी टंकलेखनाची गती क्रमश: ३० व ४० शब्द प्रती मिनीट (तत्संबंधी शासकीय परीक्षा मंडळाचे प्रमाणपत्र आवश्यक)<br>क) संगणक हाताळणी/वापराबाबतचे ज्ञान आवश्यक (महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण मुंबई यांची MSCIT परीक्षा किंवा DOEACC सोसायटी अधिकृत CCC किंवा OO किंवा A किंवा B किंवा C स्तर परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक. |
| २ | लिपिक - टंकलेखक संख्या (१०) | अ) वाणिज्य/कला/शास्त्र/तत्सम शाखेतील पदवी.<br>ब) वाणिज्य शाखा पदवीधरास प्राधान्य.<br>क) शासकीय कामकाजाची माहिती तसेच,शासकीय/निमशासकीय कार्यालयात लिपिक टंकलेखक या पदावर काम केल्याचा १ वर्ष व त्याहून अधिक अनुभव असल्यास प्राधान्य.<br>ड) Tally संगणक प्रणालीवर प्रभुत्व असल्यास प्राधान्य.<br>इ) संगणक हाताळणी/वापराबाबतचे ज्ञान आवश्यक (महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण मुंबई यांची MSCIT परीक्षा किंवा DOEACC सोसायटी अधिकृत CCC किंवा OO किंवा A किंवा B किंवा C स्तर परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक. |

*टिपणी : वरील सर्व पदांकरिता उमेदवारांची कमाल वयोमर्यादा शासनाच्या नियमानुसार असावी,*

उमेदवारांना मुलाखतीकरीता कोणताही प्रवासभत्ता देय राहणार नाही. नियुक्तीबाबतचे सर्व अधिकार प्राधिकरणास राखून ठेवण्यात येतील.

ठिकाण : मुंबई

दिनांक :२६/०७/२०१८

(ए.ई. रायते) भा.प्र.से.
**सचिव,**
**प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त,**
**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई.**